वाचले :- (१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५.
(२) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७
(३) सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसुचना क्र.करोना-२०२०/प्र.क्र.५८/ आरोग्य-५, दि.१४/०३/२०२० नुसार महाराष्ट्र कोव्हीड-१९ उपाययोजना नियम, २०२०.
(४) उपविभागीय दंडाधिकारी तथा Incident Commander माळशिरस विभाग अकलूज यांचेकडील पत्र क्र.कार्या/अ-२/जबाबी/कावि-१०८८/२०२०, दि.२४/०७/२०२०.

---

जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सोलापूर
जा.क्र. क्र.२०२०/मशा/कार्या/नैआ/जिनिक/प्र.क्र.२५/आरआर-1239
सोलापूर दि. ३१/०७/२०२०.

COLLECTOR OF SHOLAPUR

**आदेश**

ज्याअर्थी, उपविभागीय दंडाधिकारी तथा Incident Commander माळशिरस विभाग अकलूज यांनी उपोद्घोषातील क्रमांक ४ नुसार दिनांक २४/०७/२०२० रोजीच्या पत्रान्वये, माळशिरस तालुक्याकरिता "डेडिकेटेड कोव्हिड हेल्थ सेंटर" साठी इमारत अधिग्रहित होऊन मिळणेस विनंती केलेली आहे.

आणि ज्याअर्थी, उपोद्घातातील अ.क्र. ३ मधील शासन अधिसुचनेनुसार तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम, २०२० अन्वये जिल्हाधिकारी सोलापूर यांना सोलापूर जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रात कोविड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी "सक्षम प्राधिकारी" म्हणून घोषित केले आहे. तसेच नियम १० (ए) अन्वये शासकीय किंवा खाजगी इमारत / मत्ता अलगीकरण आवश्यकतेनुसार नामनिर्देशनाचे अधिकार सक्षम प्राधिकारी यांना देण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, कोरोना विषाणूंचा संसर्ग व प्रादूर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता, त्यावर नियंत्रण करणे व कोरोना विषाणूचा संसर्ग असल्यास त्यात अधिक वाढ होऊ न देता त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक असल्याने असे संशयीत रूग्ण यांना दाखल करण्याकरीता "डेडिकेटेड कोव्हिड हेल्थ सेंटर" निर्माण करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी मी, मिलिंद शंभरकर, जिल्हाधिकारी सोलापूर तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, सोलापूर मला आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ व उपोद्घोषातील अ.क्र.३ मधील शासन अधिसुचनेनुसार तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र कोविड - १९ उपाययोजना नियम, २०२० मधील निर्देशान्वये सोलापूर जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रात कोविड -१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपोद्घातातील अ.क्र. ३ मधील महाराष्ट्र कोविड - १९ उपाययोजना नियम, २०२० चा नियम १० (ए) नुसार प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून खालील विवरणपत्रातील वसाहत/इमारत कोरोना विषाणूंचा संसर्ग व प्रादुर्भाव रोखण्याकरीता "डेडिकेटेड कोव्हिड हेल्थ सेंटर" निर्माण करणे करीता आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ चे कलम 65 (1)(ब) नूसार अधिग्रहित करण्यात येत आहे.

1. "डेडिकेटेड कोव्हिड हेल्थ सेंटर (DCHC)"

| अ.क्र. | ठिकाण (शहर) | संस्थेचे नाव व पत्ता | क्षमता |
|---|---|---|---|
| १. | अकलूज | देवडीकर मेडीकल सेंटर, अकलूज | २५ |
| २. | अकलूज | कदम मल्टिस्पेशालीटी हॉस्पिटल, अकलूज | ५० |

वर नमुद केलेल्या इमारतीमधील सर्व खोल्या (Rooms) अधिग्रहित करण्यात येत आहे. सदरहू संस्थेचे प्रभारी/सक्षम अधिकारी/ प्राचार्य/ वसतीगृह अधिक्षक यांनी इमारतीचा ताबा संबंधित तालुक्याचे कार्यकारी अभियंता/ उप कार्यकारी अभियंता/ शाखा अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे तात्काळ देण्यात यावा. "डेडिकेटेड कोव्हिड हेल्थ सेंटर" येथे दाखल करण्यात आलेल्या संशयित / बाधित रुग्णांना चहापान, नाष्टा व भोजन इत्यादी सोयी-सुविधा सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात याव्यात. इमारतीमध्ये प्रवाशांच्या झोपण्यासाठी अंथरूण व अंघोळीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

सदर आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी. सदरहू आदेशाची अंमलबजावणी करण्यास संबंधितांनी टाळाटाळ केल्यास अथवा विरोध दर्शविल्यास आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील ५१ (b), भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७ व भारतीय दंड संहिता (४५ ऑफ १८६०) च्या कलम १८८ नुसार दंडनीय / कायदेशीर कारवाईस पात्र राहिल याची नोंद घ्यावी.

सदरचा आदेश आज दिनांक १७ /०७/२०२० रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.

COLLECTOR OF SHOLAPUR

(मिलिंद शंभरकर, भा.प्र.से.)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सोलापूर**

**प्रत :-**

(१) पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांचेकडे माहिती व उचित कार्यवाहीसाठी.
(२) अपर जिल्हाधिकारी सोलापूर यांचेकडे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
(३) उपविभागीय अधिकारी, माळशिरस विभाग अकलूज यांचेकडे माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
(४) तहसिलदार माळशिरस यांचेकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
(५) जिल्हा शल्यचिकित्सक सोलापूर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
(६) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग सोलापूर यांचेकडे माहिती व उचित कार्यवाहीसाठी.
(७) उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग माळशिरस यांचेकडे माहिती व उचित कार्यवाहीसाठी.